महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती
AHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION
Amravati Divisional Board, Amravati
one no. 0721-2662647 E-mail:- divsecamt@rediffmail.com

पत्र क्र. अविमं/मागो/ 2888
दिनांक- 28/03/2025

प्रति ,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्य शाळा,
अमरावती विभाग अमरावती.

विषय - माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च 2025 च्या लिखीत उत्तरपत्रिकांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ - या कार्यालयाचे पत्र क. अविमं/ मागो 2393 दि. 22 /1 / 2025

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रास अनुसरून सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दिनांक 21 मार्च 2025 ते 17 मार्च 2025 या कालावधीत लेखी परीक्षा होणार आहेत.

तरी आपल्या शाळेतील सर्व विषय शिक्षकांच्या नांवे पाठविण्यात आलेले उत्तरपत्रिकांचे बंडल / पार्सल पोस्टामार्फत प्राप्त होत आहेत.सदरील **उत्तरपत्रिकांचे पार्सल / बंडल कोणत्याही परिस्थितीत परत पाठवू नयेत.**

मंडळाच्या शिक्षासूची मधील परिशिष्ट भाग-1(अ-6)(21) अन्वये मुल्यमापनासाठ परिरक्षक कार्यालयाकडून पाठविण्यात आलेले उत्तरपत्रिकांचे पार्सल नस्विकारता मंडळाच्या पुर्वपरवानगीशिवाय परत केल्यास आपल्या माध्यमिक विदयालयाची मंडळ मान्यता रदद करण्याची तरतूद आहे. याशिवाय महाराष्ट राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विनियम 1977 अन्वये नियम क्र 67 ( 18 ) नुसार विभागीय मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या **परीक्षांसाठी माध्यमिक विदयालय आवश्यक त्या सर्व सोईसुविधा व कर्मचारी व वर्गाच्या सेवा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आपणावर आहे. याची स्पष्ट नोंद घ्यावी.**

तसेच संबंधित मुख्याध्यापक यांनी सदरचे उत्तरपत्रिकांचे पार्सल ताब्यात न घेता मंडळाकडे परत ठविल्यास त्यावर झालेला खर्च आपणाकडून वसूल करून संबंधित विदयालयांची ( अनुदानित / विनाअनुदानित / अंशतः अनुदानित / स्वयं अर्थसहायीत तत्वावरील ) मंडळ मान्यता रदद करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल याची गंभिरतेने नोंद घ्यावी .

( निलिमा टाके )
**विभागीय सचिव ,**
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती

प्रत माहितीस्तव :-
1. मा. सचिव ,महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ पुणे.
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक ), जिल्हा परिषद, अकोला / अमरावती / बुलढाणा / यवतमाळ / वाशिम.
3. अध्यक्ष / सचिव ,------------------------------------------------------------ संबंधित संस्था.